॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.i

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.i

जा.क्र.: रासेयो/२०२६—२७/१६८ परिपत्रक दिनांक : २१/११/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य / राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी,
संलग्नीत सर्व महाविद्यालये व
विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : बालविवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत ''बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मुलन आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त'' बालविवाह सप्ताहाच्या अनुषंगाने दिनांक २० ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.

संदर्भ : १. महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. म.रा.बा.स..पुणे/२०२६-२७/१८५८, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२६.

२. मा. केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री, भारत सरकार यांचे D.O. No. WW-138/2020-WW-Part (6) (e-118856), दिनांक २८ ऑक्टोबर २०२६.

3. निवासी जिल्हाधिकारी,नांदेड यांचे जा.क्र.जिमबाअिना / जिबासंकनां / बालहक्कसप्ताह /२०२६—२७/२०२६ दि.१९.११.२०२६

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्या वतीने बालविवाह निर्मूलनासाठी 'बालविवाह मुक्त भारत अभियान' राबविण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र महासभेने दिनांक २७ नोव्हेंबर हा दिवस बालविवाह, बालकांचे लवकर व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून घोषित केला आहे.

त्यानुसार दिनांक २० ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत बालहक्क सप्ताह व बालविवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिवसाच्या अनुषंगाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसरात बालविवाह निर्मूलन, बालहक्क संरक्षण, बालकांचे शिक्षण, सुरक्षित बालपण तसेच बालविवाहाचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

सदर उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित महाविद्यालयांना खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या सोपविण्यात येत आहेत.

१. विभागनिहाय जबाबदाऱ्या

अ) राष्ट्रीय सेवा योजना विभाग १. विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत बालविवाह निर्मूलन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. २. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या सहभागातून जनजागृती रॅलीचे आयोजन करावे. ३. बालविवाह निर्मूलनाची सामूहिक प्रतिज्ञा घेण्याबाबत महाविद्यालयांना निर्देश द्यावेत. ४. पथनाट्य, व्याख्याने, चर्चासत्रे व जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करावेत. ५. आयोजित उपक्रमांचा अहवाल व छायाचित्रे संकलित करून विद्यापीठास सादर करावीत.

ब) विद्यार्थी विकास विभाग १. विद्यार्थ्यांमध्ये बालविवाहाचे दुष्परिणाम व बालहक्क याबाबत जनजागृती करावी. २. विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, पोस्टर व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करावे. ३. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा.

क) महिला विकास कक्ष / महिला तक्रार निवारण कक्ष १. बालविवाह निर्मूलन, मुलींचे शिक्षण, महिला सक्षमीकरण व बालहक्क संरक्षण या विषयांवर व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करावीत. २. महिला व मुलींच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करावी. ३. संबंधित विषयातील तज्ज्ञ व समुपदेशकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे.

ड) जनसंपर्क विभाग १. बालविवाह निर्मूलन अभियानासंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व अधिकृत समाजमाध्यमांवर जनजागृतीपर संदेश प्रसिद्ध करावेत. २. अभियानाच्या प्रसिद्धीसाठी पोस्टर, बॅनर, छायाचित्रे व इतर प्रचार साहित्याचा वापर करावा. ३. आयोजित कार्यक्रमांची माहिती वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्ध करावी.

इ) राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या समन्वयाने महाविद्यालयीन स्तरावर जनजागृती रॅली, प्रतिज्ञा, पथनाट्य, किशोरी सभा, ग्रामसभा व इतर जनजागृतीपर उपक्रम राबविण्यासाठी संलग्नित महाविद्यालयांना प्रोत्साहित करावे.

२. सर्व संबंधित विभागांसाठी सर्वसाधारण सूचना

१. वरीलप्रमाणे सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांनुसार संबंधित विभागांनी आपापल्या स्तरावर कार्यक्रमांचे नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करावी.

२. विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये व संबंधित घटकांना या अभियानात सहभागी करून घ्यावे.

३. दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी बालविवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिवसानिमित्त विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करावा.

४. बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ तसेच बालविवाहाचे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व वैयक्तिक जीवनावर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करावी.

५. बालविवाह मुक्त भारत अभियानाच्या अधिकृत पोर्टलवर (https://stopchildmarriage.wcd.gov.in/) नागरिक, विद्यार्थी व संबंधित घटकांना बालविवाहाविरुद्ध प्रतिज्ञा घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

६. आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल, सहभागींची संख्या व छायाचित्रे संबंधित विभागांनी संकलित करून राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत सादर करावीत.

सदर अभियान हे सामाजिक दायित्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने सर्व संबंधित विभागप्रमुखांनी सोबत जोडलेल्या शासन पत्राचे अवलोकन करुन आपापल्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांचे काटेकोरपणे पालन करून अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

सदर बाब अत्यंत तातडीची व महत्त्वाची असल्याने आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करुन संक्षिप्त अहवाल विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या nss@srtmun.ac.in इमेलवर सादर करावा.

डॉ.मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) जनसंपर्क अधिकारी,प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

२८ राणीचा बाग, जुन्या सर्किटहाउस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६३६००६३ ई-मेल mscps.state1@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./म.रा.बा.सं.सं./पुणे/२०२६-२७/ १८५८ दिनांक : १७/११/२०२६

प्रति,

जिल्हाधिकारी,

सर्व.

विषय :- बालहक्क सप्ताह तसेच दिनांक २७ नोव्हेंबर, २०२६ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या 'बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिना'निमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत व कार्यक्रमांचे अहवाल सादर करण्याबाबत.

संदर्भ:- मा. मंत्री महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे अर्धशासकीय पत्र क्र. D.O. No. WW-138/2020-WW-Part (6) (e-118856). दि.२८/०८/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये संयुक्त राष्ट्र महासभेने (UN) दिनांक ०४ सप्टेंबर, २०२६ रोजी ठराव मंजूर करून दरवर्षी दिनांक २७ नोव्हेंबर हा दिवस **बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिवस (International Day for the Elimination of Child, Early and Forced Marriage)** म्हणून घोषित केला आहे. बालविवाह ही बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारी सामाजिक समस्या असून त्यामुळे बालकांच्या शिक्षणावर, आरोग्यावर, व्यक्तिमत्त्व विकासावर तसेच त्यांच्या सुरक्षित व सन्मानपूर्वक जीवन जगण्याच्या अधिकारावर विपरीत परिणाम होतो. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा-महाविद्यालये, महिला बचत गट व समुदाय यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने जिल्ह्यात **दिनांक १८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर, २०२६** या कालावधीत बालहक्क सप्ताह व बालविवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिनाच्या अनुषंगाने विविध जनजागृतीपर कार्यक्रम, प्रतिज्ञा, रॅली, किशोरी सभा, ग्रामसभा, ग्राम बाल संरक्षण समिती बैठका तसेच शाळा व महाविद्यालय स्तरावर जनजागृती उपक्रम आयोजित करण्याबाबत संबंधितांना आदेशीत करावे. सदर कार्यक्रम खालीलप्रमाणे विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करून राबविण्यात यावेत.

१. विभागनिहाय कार्यक्रम व जबाबदाऱ्या

अ) शिक्षण विभाग

1. जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह निर्मूलन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत.
2. विद्यार्थ्यांच्या सहभागातून बालविवाह निर्मूलन जनजागृती रॅली काढण्यात यावी.
3. सर्व शाळांमध्ये बालविवाह निर्मूलनाची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात यावी.
4. निबंध, वक्तृत्व, चित्रकला व घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करावे.
5. बालविवाहाचे दुष्परिणाम व बालहक्क याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

ब) आरोग्य विभाग

1. ग्रामीण व शहरी भागांमध्ये किशोरी सभा आयोजित करून बालविवाहाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, किशोरवयीन आरोग्य व पोषण याबाबत जनजागृती करावी.
2. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) व राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम (RKSK) अंतर्गत कार्यरत समुपदेशकांच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती व समुपदेशन सत्रे आयोजित करावीत.
3. बालविवाहामुळे माता व बालकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत माहिती द्यावी.
4. आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून समुदाय स्तरावर जनजागृती करावी.

क) पंचायत विभाग

1. सर्व ग्रामपंचायतींमध्ये बालविवाह निर्मूलनाबाबत दवंडी देऊन जनजागृती करावी.
2. ग्रामपंचायत स्तरावर विशेष बैठक आयोजित करून गाव बालविवाहमुक्त गाव करण्याबाबत चर्चा करावी.
3. ग्रामसभेमध्ये बालविवाहमुक्त गाव करण्याबाबत ठराव मंजूर करावा.
4. गावातील बालविवाह प्रतिबंधासाठी ग्रामपंचायत, ग्रामसेवक, सरपंच व ग्रामस्तरीय यंत्रणेचा सक्रिय सहभाग घ्यावा.
5. गावामध्ये बालविवाह होणार नाही याबाबत प्रचार प्रसिद्धी द्वारे जनजागृती व प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

ड) महिला व बालकल्याण विभाग (जि.प.)

1. अंगणवाडी केंद्र व गावस्तरावर किशोरी सभा आयोजित कराव्यात.
2. ग्राम बाल संरक्षण समितीच्या विशेष बैठका आयोजित कराव्यात.
3. बालविवाह निर्मूलनाबाबत सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात यावी.
4. अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांच्या माध्यमातून पालक, किशोरवयीन मुली व महिलांमध्ये जनजागृती करावी.
5. बालविवाहाची संभाव्य प्रकरणे निदर्शनास आल्यास संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

इ) उमेद व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)

1. महिला बचत गटांच्या माध्यमातून गावोगावी बालविवाह निर्मूलनाबाबत जनजागृती करावी.
2. बचत गटांच्या बैठकीमध्ये बालविवाहाचे दुष्परिणाम व कायदेशीर तरतुदींबाबत माहिती द्यावी.
3. महिला व बचत गट सदस्यांची बालविवाह प्रतिबंधक सामूहिक प्रतिज्ञा घ्यावी.
4. गावपातळीवर महिला नेतृत्वाच्या माध्यमातून बालविवाहमुक्त गाव संकल्पना रुजविण्यासाठी प्रयत्न करावेत.

फ) जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्पलाईन (१०९८)

1. शाळा, महाविद्यालये व समुदाय स्तरावर बालविवाह निर्मूलन व बालहक्क याबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत.
2. बालविवाह प्रतिबंधक कायदा व बाल संरक्षण यंत्रणेबाबत माहिती द्यावी.
3. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ बाबत जनजागृती करून बालकांच्या मदतीसाठी उपलब्ध यंत्रणेची माहिती द्यावी.
4. बालविवाहाची संभाव्य प्रकरणे रोखण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधावा.
5. बाल संरक्षण विषयक जनजागृतीपर उपक्रम आयोजित करावेत.

२. कार्यक्रमाचे दिनांकवार वेळापत्रक

दिनांक	प्रस्तावित कार्यक्रम	संबंधित विभाग
१८ नोव्हेंबर २०२६	बालहक्क सप्ताह व बालविवाह निर्मूलन अभियानाचा शुभारंभ,	सर्व विभाग

	बालविवाह निर्मूलन प्रतिज्ञा	
१९ नोव्हेंबर २०२६	पोलीस ठाणे स्तरावर बालविवाह प्रतिबंधक जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत बैठकांचे आयोजन करणे	पोलीस विभाग
२० नोव्हेंबर २०२६	बालहक्क, बालविवाहाचे दुष्परिणाम व किशोरवयीन आरोग्य जनजागृती सत्र	शिक्षण व आरोग्य विभाग (जि.प.)
२१ नोव्हेंबर २०२६	गावपातळीवर बालविवाह प्रतिबंधक जनजागृती व पोलीस पाटील यांच्या माध्यमातून माहिती प्रसारित करणे	पोलीस विभाग व पंचायत विभाग
१९ नोव्हेंबर २०२६	गावोगावी दवंडी व बालविवाहमुक्त गाव करण्याबाबत ग्रामपंचायत बैठक	पंचायत विभाग (जि.प.)
२० नोव्हेंबर २०२६	महिला बचत गट बैठक व बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा	उमेद व माविम
२३ नोव्हेंबर २०२६	किशोरी सभा व बालविवाह निर्मूलन विषयक समुपदेशन	महिला व बालकल्याण विभाग (जि.प.)
२३ नोव्हेंबर २०२६	ग्राम बाल संरक्षण समिती बैठक व बालविवाह प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत चर्चा	महिला व बालकल्याण विभाग (जि.प.)
२५ नोव्हेंबर २०२६	शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा व बाल संरक्षण जनजागृती	जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्पलाईन, पोलीस विभाग, NSS
२५ नोव्हेंबर २०२६	शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह निर्मूलन जनजागृती रॅली व प्रतिज्ञा	शिक्षण विभाग (जि.प.)NSS
२६ नोव्हेंबर २०२६	RKSK समुपदेशकांमार्फत शाळा व महाविद्यालयांमध्ये किशोरवयीन आरोग्य व बालविवाह निर्मूलन जनजागृती	आरोग्य विभाग (जि.प.)
२७ नोव्हेंबर २०२६	**बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विशेष कार्यक्रम, सामूहिक जनजागृती अभियान तसेच** बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा https://stopchildmarriage.wcd.gov.in या अधिकृत पोर्टलवर घेण्यासाठी प्रोत्साहित करणे.	**सर्व विभाग**
२७ नोव्हेंबर २०२६	महिला बचत गट, ग्रामस्तरीय संस्था व समुदायाच्या सहभागातून जनजागृती	उमेद, माविम व पंचायत विभाग
२७ नोव्हेंबर २०२६	प्रभाग व ग्राम बाल संरक्षण समितीच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध व बाल संरक्षण विषयक जनजागृती	महिला व बालकल्याण (जि.प.) व बालविकास प्रकल्प अधिकारी, सर्व (नागरी व ग्रामीण) NSS
३० नोव्हेंबर २०२६	अभियानाचा समारोप, कार्यक्रमांचा आढावा व अहवाल संकलन	सर्व संबंधित विभाग

३. अहवाल सादर करण्याबाबत

१) वरीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांचे छायाचित्रे, उपस्थिती संख्या, कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल व इतर आवश्यक माहिती संकलित करावी.

२) प्रत्येक विभागातील तालुकास्तरीय बालविवाह निर्मुलन (ECM) चॅम्पियन्स यांनी आपल्या अधिनस्त तालुका व गावस्तरीय यंत्रणेमार्फत राबविलेल्या कार्यक्रमांचा एकत्रित अहवाल आयुक्तालयास **दिनांक ०२ डिसेंबर २०२६ पर्यंत** सादर करणे बाबत संबंधितांना आदेशीत करावे.

३) सर्व विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक सूचना देऊन कार्यक्रमांचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करावी.

४) सदर अभियान केवळ औपचारिक स्वरूपात न राबविता गावपातळीपर्यंत पोहोचवून बालविवाहमुक्त जिल्हा, तालुका व गांव निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी.

तरी, वरीलप्रमाणे नियोजित कार्यक्रमांचे आयोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व विहित मुदतींत अहवाल सादर करणे बाबत संबंधितांना आदेशीत करावे.

वर्षा लड्ढा (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. सचिव, महिला व ब विकास विभाग, मंत्रालय-मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : आवश्यक कार्यवाहीस्तव -

१. विभागीय उप आयुक्त (सर्व)
२. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी (सर्व).
३. बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी व ग्रामीण) सर्व.

अन्नपूर्णा देवी
ANNPURNA DEVI

सत्यमेव जयते

महिला एवं बाल विकास मंत्री
भारत सरकार
Minister of Women & Child Development
Government of India

Dated: 28th October, 2026

D.O. No. WW-138/2020-WW-Part (6) (e-118856)

Respected Smt. Aditi Sunil Tatkare ji,

As you are aware, the Government of India has accorded high priority to the elimination of child marriage and ensuring that every child enjoys a safe, healthy and empowered childhood. In furtherance of this objective, the Ministry of Women and Child Development launched the Bal Vivah Mukt Bharat (BVMB) Campaign on 27th November, 2024, adopting a "Whole of Government" and "Whole of Society" approach to strengthen awareness, community participation and coordinated action towards making India free from child marriage.

2. As part of the ongoing BVMB Campaign, 27th November, 2026, marks an important occasion to renew our collective commitment towards the goal of a child marriage-free India. I request you to kindly ensure that focused awareness and outreach activities are organised across the State, District, Block and Taluk levels, involving local communities, elected representatives, educational institutions, religious and community leaders, frontline functionaries and other relevant stakeholders. Special emphasis may be placed on community mobilisation, awareness of the harmful consequences of child marriage and the importance of preventing the practice.

3. I also request you to facilitate widespread participation in the BVMB Campaign by encouraging citizens, institutions and community stakeholders to take the pledge against child marriage through the BVMB Portal (https://stopchildmarriage.wcd.gov.in/). The State/UT Government and the Department of Women and Child Development may also ensure that their official social media handles disseminate suitable campaign messages, creatives, videos and other publicity material on and around 27th November, 2026, to amplify the campaign's reach and encourage public participation.

4. The observance of 27th November as the International Day for the Elimination of Child, Early and Forced Marriage, as designated by the United Nations General Assembly, further reinforces the importance of sustained efforts under the BVMB Campaign.

5. I am confident that your personal leadership and support will give further impetus to the Bal Vivah Mukt Bharat Campaign and strengthen collective efforts towards ensuring a child marriage-free India.

With regards,

Yours sincerely,

(Annpurna Devi)

Smt. Aditi Sunil Tatkare
Hon'ble Minister of Women and Child Development Department
Government of Maharashtra
Mantralaya, Mumbai - 400032.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय,

महिला व बाल विकास भवन, म.फुले मार्केट चे मागे, गणेशनगर रोड, नांदेड-४३१ ६०२

E-mail ID - dwcdond@gmail.com दुरध्वनी क्र.-(०२४६२) २६१२४२/२६७८००

जा.क्र.जिमबाविअनां/जिबासंकनां/बालहक्कसप्ताह/२०२६-२७ / 2036 दिनांक :- 19/११/२०२६

प्रति,

१.जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, नांदेड
२.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट
३..उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(पंचायत) जि.प.,नांदेड
४.जिल्हा कार्यक्रम अधिकारी,(म.बा.क.) जि.प.,नांदेड
५.जिल्हा आरोग्य अधिकारी, (आरोग्य विभाग) जि.प.,नांदेड
६.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नांदेड
७.शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक, जि.प.,नांदेड
८.बालविकास प्रकल्प अधिकारी, सर्व, नागरी व ग्रामीण प्रकल्प
९.पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन (सर्व), नांदेड जिल्हा
१०.संचालक,राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
११.जिल्हा अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,नांदेड
१२.जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ,नांदेड
१३.जिल्हा समन्वयक, नेहरू युवा केंद्र संघटन, नांदेड
१४.प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय, (सर्व) नांदेड
१५.व्यवस्थापक, युनिसेफ, जनसेवा ग्रामीण विकास व शिक्षण संस्था,नांदेड

विषय : बालहक्क सप्ताह तसेच दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या 'बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिना'निमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत व कार्यक्रमांचे अहवाल सादर करण्याबाबत.

संदर्भ : १.मा.सचिव, महिला व बालविकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.D.O.No.138/2020-WW- Part(6), दिनांक २१ ऑक्टोबर २०२६.
२. मा.आयुक्त, महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.१८५८, दि.१७/११/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्र महासभेने (UN) दिनांक ०४ सप्टेंबर २०२६ रोजी ठराव मंजूर करून दरवर्षी दिनांक २७ नोव्हेंबर हा दिवस **'बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिवस' (International Day for the Elimination of Child, Early and Forced Marriage)** म्हणून घोषित केला आहे. बालविवाह ही बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारी सामाजिक समस्या असून त्यामुळे बालकांच्या शिक्षणावर, आरोग्यावर, व्यक्तिमत्त्व विकासावर तसेच त्यांच्या सुरक्षित व सन्मानपूर्वक जीवन जगण्याच्या अधिकारावर विपरीत परिणाम होतो. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा-महाविद्यालये, महिला बचत गट व समुदाय यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने जिल्ह्यात **दिनांक १९ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६** या कालावधीत बालहक्क सप्ताह व बालविवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिनाच्या अनुषंगाने विविध जनजागृतीपर कार्यक्रम, प्रतिज्ञा, रॅली, किशोरी सभा, ग्रामसभा, ग्राम बाल संरक्षण समिती बैठका तसेच शाळा व महाविद्यालय स्तरावर जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात यावेत.

Scanned with OKEN Scanner

सदर कार्यक्रम खालीलप्रमाणे विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करून राबविण्यात यावेत.

१. विभागनिहाय कार्यक्रम व जबाबदाऱ्या

I) शिक्षण विभाग

1. जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह निर्मूलन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत.
2. विद्यार्थ्यांच्या सहभागातून बालविवाह निर्मूलन जनजागृती रॅली काढण्यात यावी.
3. सर्व शाळांमध्ये बालविवाह निर्मूलनाची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात यावी.
4. निबंध, वक्तृत्व, चित्रकला व घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करावे.
5. बालविवाहाचे दुष्परिणाम व बालहक्क याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

II) आरोग्य विभाग

1. ग्रामीण व शहरी भागांमध्ये किशोरी सभा आयोजित करून बालविवाहाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, किशोरवयीन आरोग्य व पोषण याबाबत जनजागृती करावी.
2. RKSK कार्यक्रमांतर्गत कार्यरत समुपदेशकांच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती व समुपदेशन सत्रे आयोजित करावीत.
3. बालविवाहामुळे माता व बालकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत माहिती द्यावी.
4. आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून समुदाय स्तरावर जनजागृती करावी.

III) पंचायत विभाग

1. सर्व ग्रामपंचायतींमध्ये बालविवाह निर्मूलनाबाबत दवंडी देऊन जनजागृती करावी.
2. ग्रामपंचायत स्तरावर विशेष बैठक आयोजित करून गाव बालविवाहमुक्त गाव करण्याबाबत चर्चा करावी.
3. ग्रामसभेमध्ये बालविवाहमुक्त गाव करण्याबाबत ठराव मंजूर करावा.
4. गावातील बालविवाह प्रतिबंधासाठी ग्रामपंचायत, ग्रामसेवक, सरपंच व ग्रामस्तरीय यंत्रणेचा सक्रिय सहभाग घ्यावा.
5. गावामध्ये बालविवाह होणार नाही याबाबत IEC द्वारे जनजागृती व प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

IV) महिला व बालकल्याण विभाग (जि.प.)

1. अंगणवाडी केंद्र व गावस्तरावर किशोरी सभा आयोजित कराव्यात.
2. ग्राम बाल संरक्षण समितीच्या विशेष बैठका आयोजित कराव्यात.
3. बालविवाह निर्मूलनाबाबत सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात यावी.
4. अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांच्या माध्यमातून पालक, किशोरवयीन मुली व महिलांमध्ये जनजागृती करावी.
5. बालविवाहाची संभाव्य प्रकरणे निदर्शनास आल्यास संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

V) उमेद व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)

1. महिला बचत गटांच्या माध्यमातून गावोगावी बालविवाह निर्मूलनाबाबत जनजागृती करावी.
2. बचत गटांच्या बैठकीमध्ये बालविवाहाचे दुष्परिणाम व कायदेशीर तरतुदींबाबत माहिती द्यावी.
3. महिला व बचत गट सदस्यांची बालविवाह प्रतिबंधक सामूहिक प्रतिज्ञा घ्यावी.
4. गावपातळीवर महिला नेतृत्वाच्या माध्यमातून बालविवाहमुक्त गाव संकल्पना रुजविण्यासाठी प्रयत्न करावेत.

VI) जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्पलाईन (१०९८)

1. शाळा, महाविद्यालये व समुदाय स्तरावर बालविवाह निर्मूलन व बालहक्क याबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत.
2. बालविवाह प्रतिबंधक कायदा व बाल संरक्षण यंत्रणेबाबत माहिती द्यावी.
3. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ बाबत जनजागृती करून बालकांच्या मदतीसाठी उपलब्ध यंत्रणेची माहिती द्यावी.
4. बालविवाहाची संभाव्य प्रकरणे रोखण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधावा.
5. बाल संरक्षण विषयक जनजागृतीपर उपक्रम आयोजित करावेत.

VII) राष्ट्रीय सेवा योजना, समाजकार्य महाविद्यालय, स्वयंसेवी संस्था

1. शाळा, महाविद्यालये व समुदाय स्तरावर बालविवाह निर्मूलन व बालहक्क याबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत.

Scanned with OKEN Scanner

२. कार्यक्रमाचे दिनांकवार वेळापत्रक

दिनांक	प्रस्तावित कार्यक्रम	संबंधित विभाग
१८ नोव्हेंबर २०२६	बालहक्क सप्ताह व बालविवाह निर्मूलन अभियानाचा शुभारंभ, बालविवाह निर्मूलन प्रतिज्ञा	सर्व विभाग
१९ नोव्हेंबर २०२६	पोलीस ठाणे स्तरावर बालविवाह प्रतिबंधक जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत बैठकांचे आयोजन करणे	पोलीस विभाग
२० नोव्हेंबर २०२६	बालहक्क, बालविवाहाचे दुष्परिणाम व किशोरवयीन आरोग्य जनजागृती सत्र	शिक्षण व आरोग्य विभाग (जि.प.)
२१ नोव्हेंबर २०२६	गावपातळीवर बालविवाह प्रतिबंधक जनजागृती	पोलीस विभाग व पंचायत विभाग, उमेद, माविम
१९ नोव्हेंबर २०२६	गावोगावी दवंडी व बालविवाहमुक्त गाव करण्याबाबत ग्रामपंचायत बैठक	पंचायत विभाग (जि.प.)
२० नोव्हेंबर २०२६	महिला बचत गट बैठक व बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा	उमेद व माविम
२३ नोव्हेंबर २०२६	किशोरी सभा व बालविवाह निर्मूलन विषयक समुपदेशन	महिला व बालकल्याण विभाग (जि.प.)
२३ नोव्हेंबर २०२६	ग्राम बाल संरक्षण समिती बैठक व बालविवाह प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत चर्चा	महिला व बालकल्याण विभाग (जि.प.), पंचायत विभाग
२५ नोव्हेंबर २०२६	शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा व बाल संरक्षण जनजागृती	जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्पलाईन, पोलीस विभाग, NSS
२५ नोव्हेंबर २०२६	शाळा व महाविद्यालयांमध्ये बालविवाह निर्मूलन जनजागृती रॅली व प्रतिज्ञा	शिक्षण विभाग (जि.प.) NSS, समाजकार्य महाविद्यालय
२६ नोव्हेंबर २०२६	RKSK समुपदेशकांमार्फत शाळा व महाविद्यालयांमध्ये किशोरवयीन आरोग्य व बालविवाह निर्मूलन जनजागृती	आरोग्य विभाग (जि.प.) RKSK
२७ नोव्हेंबर २०२६	**बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विशेष कार्यक्रम, सामूहिक प्रतिज्ञा व जनजागृती अभियान**	**सर्व विभाग**
२७ नोव्हेंबर २०२६	महिला बचत गट, ग्रामस्तरीय संस्था व समुदायाच्या सहभागातून जनजागृती	उमेद, माविम व पंचायत विभाग, समाजकार्य महाविद्यालय
२७ नोव्हेंबर २०२६	प्रभाग व ग्राम बाल संरक्षण समितीच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध व बाल संरक्षण विषयक जनजागृती	महिला व बालकल्याण (जि.प.) व बालविकास प्रकल्प अधिकारी, सर्व (नागरी व ग्रामीण), NSS
३० नोव्हेंबर २०२६	अभियानाचा समारोप, कार्यक्रमांचा आढावा व अहवाल संकलन	सर्व संबंधित विभाग

३. अहवाल सादर करण्याबाबत

१. वरीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांचे छायाचित्रे, उपस्थिती संख्या, कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल व इतर आवश्यक माहिती संकलित करावी.

२. प्रत्येक विभागातील तालुकास्तरीय बालविवाह निर्मुलन (ECM) चॅम्पियन्स यांनी आपल्या अधिनस्त तालुका व गावस्तरीय यंत्रणेमार्फत राबविलेल्या कार्यक्रमांचा एकत्रित अहवाल, छायाचित्रे खालील Google Form Link द्वारे तसेच लेखी अहवाल जिल्हा महिला बालविकास अधिकारी नांदेड यांना **दिनांक ०२ डिसेंबर २०२६ पर्यंत** सादर करावा.

Link for Reporting : https://ee.kobotoolbox.org/x/GaWhYRyk इमेल: dwcdond@gmail.com

Scanned with OKEN Scanner

३. सर्व विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक सूचना देऊन कार्यक्रमांचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करावी.

४. सदर अभियान केवळ औपचारिक स्वरूपात न राबविता गावपातळीपर्यंत पोहोचवून बालविवाहमुक्त नांदेड जिल्हा निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी.

तरी, वरीलप्रमाणे नियोजित कार्यक्रमांचे आयोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व विहित मुदतीत अहवाल सादर करावा.

निवासी जिल्हाधिकारी
नांदेड

प्रत माहितीस्तव: १.मा.आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.मा.अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड
३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
४.विभागीय उपआयुक्त, महिला बालविकास विभाग, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
५.अध्यक्ष/सदस्य, बालकल्याण समिती, नांदेड
६.जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, नांदेड यांनी सदर जनजागृती सप्ताह कार्यक्रमाची व्यापक प्रचार प्रसिद्धी द्यावी.

Scanned with OKEN Scanner